जा.क्र. शिउसं / नावि / उमा / 2009 / १५३०३-०७२.
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक
दि.3/8/2009

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव.

विषय :- इ. १० वी ची परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी प्रवेशासाठी ए.टी.के.टी. ची Allowed To Keep Terms सवलत देण्याबाबत...

संदर्भ : १) शासन पत्र क्र. एचएससी / २००९ / (१६७/०९) / माशि -२, दि. २०/७/२००९
२) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे दि. २३/७/२००९ चे आदेश
३) मा. शिक्षण संचालक म. रा. पुणे यांचे पत्र क्र. एचएससी / १५२००९ / ६३१६९ / १२ एचएस / ७२५२ / दि. २७/७/२००९.
४) मा. शिक्षण संचालक म. रा. पुणे यांचे पत्र क्र. एचएससी / १५२००९ / ६३१६९ / १२ एचएस / दि. २/८/२००९.
५) या कार्यालयाचे पत्र दि. २/८/२००९

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, माहे फेब्रुवारी / मार्च २००९ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १० वी परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, याकरिता सदर परीक्षेत कमाल दोन विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात इ. ११ वी मध्ये प्रवेश देण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून शासनाने संदर्भिय पत्रान्वये मंजूरी आहे.

१) ए.टी.के.टी ची सवलत मार्च २००९ मध्ये इ. १० वीच्या शालांत परीक्षेस सर्व विषय घेवून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांकरिताच आहे. इतरांसाठी नाही.
२) शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये इ. ११ वी च्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत कमाल दोन विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ए.टी.के.टी ची सवलत लागू राहील.
३) विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी मात्र ए.टी.के.टी. सवलत प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यास विज्ञान विषयात किमान ४० टक्के गुण असणे आवश्यक राहील.
४) जो विद्यार्थी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत (इ. १० वी) सर्व विषय घेवून (श्रेणी विषयाव्यतिरिक्त) एका वेळी प्रविष्ठ होईल (श्रेणी सुधार योजना वगळता) त्यालाच ए.टी.के.टी. ची सवलत लागू राहील.
५) ए.टी.के.टी. सवलत देय असणाऱ्या विद्यार्थ्याने ज्या शाळेतून इ. १० वी ची शालांत परीक्षा दिलेली आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी व त्याला ए.टी.के.टी. साठीचे बोनाफाईड प्रमाणपत्र द्यावे.
६) कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी ए.टी.के.टी. बाबत सविस्तर सूचना, सूचना फलकावर लावाव्यात.
७) ए.टी.के.टी. सवलतीमुळे मिळणारा प्रवेश हा तात्पुरत्या स्वरूपाचा असेल.

८) ए.टी.के.टी. ची सवलत घेवून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद जनरल रजिस्टरला करू नये. स्वतंत्र नोंदवहीत नोंद करावी. सदर विद्यार्थ्यांनी शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा पुरावा सादर केल्यानंतर नोंद जनरल रजिस्टरला करावी.

९) या विद्यार्थ्यांचे प्रवेश शालांत परीक्षेची गुणपत्रिका व बोनाफाईड प्रमाणपत्रावर(ए.टी.के.टी. साठीचे प्रमाणपत्र) (विद्यार्थी इ. १० वी ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेचे) द्यावयाचे आहेत. या विद्यार्थ्यांना पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याच्या दाखला सादर करण्याची सक्ती करु नये.

१०) ए.टी.के.टी. ची सवलत घेवून प्रवेश घेणारा विद्यार्थी मार्च २००९ सर्व विषय घेवून शालांत परीक्षेला बसलेला आहे याची खात्री करुनच प्राचार्यांनी प्रवेश द्यावा. चुकीचा प्रवेश झाल्यास सर्वस्वी जबाबदारी प्रवेश देणाऱ्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

११) सदर विद्यार्थ्यांचा नापास झालेल्या विषयांचा निकाल (उत्तीर्ण झाल्याचा निकाल) सादर करेपर्यंत इ.११ वी चा निकाल घोषित करु नये.

१२) सदर विद्यार्थ्यांना इ. ११ वी च्या वर्गात शिकत असताना ए.टी.के.टी. मिळालेले विषय घेवून ऑक्टोबर २००९ किंवा मार्च २०१० मधील शालांत परीक्षेत ए.टी.के.टी. प्राप्त विषयामध्ये उत्तीर्ण न झाल्यास त्याला देण्यात आलेला इ.११ वी चा प्रवेश रद्द करण्यात येईल.

१३) या विद्यार्थ्यांचा समावेश कार्यभार गणनेसाठी करण्यात येईल.

१४) विद्यार्थ्यास ए.टी.के.टी. ची सवलत घेण्याचा अथवा नाकारण्याचा विकल्प राहील.

१५) ए.टी.के.टी. ची सवलत घेवून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही फी सवलत मिळणार नाही.

१६) ए.टी.के.टी. ची सवलत फक्त महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे या विद्यार्थ्यांसाठीच आहे इतर मंडळातील विद्यार्थ्यांसाठी ही सवलत देय ठरणार नाही.

तरी उपरोक्त विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतची कार्यवाही संदर्भ पत्र क्र ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे करावी तसेच या विद्यार्थ्यांना प्रवेश दि ३ ते ११ ऑगस्ट २००९ या कालावधीत देण्याबाबतच्या सूचना आपल्या जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात याव्यात. याबाबतची प्रसिध्दी सर्व स्थानिक वृत्त पत्रातून द्यावी.

शिक्षण उपसंचालक

नाशिक विभाग, नाशिक

*Girase*

प्रत : मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म. रा. पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत - मा. शिक्षणाधिकारी [illegible]

शिक्षणाधिकारी, (माध्य.)
जिल्हा परिषद, जळगाव